नवप्रभा

# वक्तृत्व स्पर्धेत मीना कुडचिरकर प्रथम

**दोडामार्ग (न. वा.)**

येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात प्रथमच आयोजिलेल्या फोरम ऑफ फ्री एंटरप्राईज, मुंबई पुरस्कृत ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धेत मीना कुडचिरकर ही सर्वप्रथम आली. एकूण २५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यात द्वितीय क्रमांक सागर गवस तर तृतीय क्रमांक भाग्यश्री गवस हिने मिळविला. उत्तेजनार्थ पौर्णिमा वराडकर व पल्लवी पार्टे यांना गौरवण्यात आले. पहिल्या तीन क्रमांकांना रोख पारितोषिके व प्रशस्तीपत्र तर उत्तेजनार्थ दोन विद्यार्थ्यांना प्रशस्ती पत्रे देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयीन युवकांमध्ये आर्थिक विषयावर जागृती व चिंतन व्हावे या उद्देशाने मुंबईतील फोरम ऑफ फ्री एंटरप्राईज या संस्थेने गेली ५० वर्षे सातत्याने ए. डी. श्रॉफ मेमोरियल इलोक्युशन काँपिटिशन या नावाने या स्पर्धा आयोजित केल्या असून या स्पर्धेत हळबे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परीक्षक म्हणून प्रा. हुनुसवाडकर, प्रा. डी. वाय. बर्वे, प्रा. डॉ. एम. टी. बेग यांनी काम पाहिले. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दीप प्रज्वलन व सरस्वतीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. समारंभास प्रमुख अतिथी म्हणून नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या नियामक समितीचे सदस्य व प्रसिद्ध उद्योजक विवेकानंद नाईक उपस्थित होते. त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. त्यानंतर फोरम ऑफ फ्री एंटरप्राईज, मुंबई या संस्थेचा इतिहास कथन करून व ए. डी. श्रॉफ यांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आर्थिक, व्यापार व उद्योग क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन डॉ. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

# ‘तिळारी’वरील शोधनिबंधाची निवड

**दोडामार्ग (न. प्र.)**

मुंबई विद्यापीठाची जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा नुकतीच देवगड येथील स. ह. केळकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रशांत गवस याने ‘तिळारी पुनर्वसन ग्रस्तांसमोरील समस्या’ या विषयावर संशोधन प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाची उत्कृष्ट संशोधन प्रकल्पासाठी विद्यापीठाने निवड करून त्याचा गौरव करण्यात आला. आता हा संशोधन प्रकल्प पनवेल येथे होणाऱ्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी पात्र ठरविण्यात आला आहे. त्याबद्दल प्रशांतचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तिळारी प्रकल्पाचा सर्वांगिण अभ्यास करतानाच या प्रकल्पात बाधित झालेल्या पुनर्वसन ग्रस्तांची सध्या काय स्थिती आहे. त्यांच्यासमोर कोणत्या समस्या आहेत व त्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे यावर सदर संशोधन प्रकल्पाद्वारे प्रकाश टाकण्यात आला आहे.